CALCULATION SHEET

PROJ

CLIENT: जे. आर. डी टाटा

DATE:

जे.आर.डी टाटा हे टाटा उद्योग समुहाचे
दिवंगत अध्यक्ष होते. त्यांचे पूर्ण नाव
जहांगीर रतनजी दादाभाई टाटा असे होते.
त्यांचा जन्म २९ जुलै, १९०४ मध्ये पॅरिस
येथे झाला त्यांच्या वडिलांचे नाव जहांगीर
आणि फ्रेंच आईचे नाव सुझान होते, त्यांचे
बालपण पॅरिस शहरातच गेले, पण मॅट्रीक
पर्यंतचे शिक्षण मुंबईत झाले. त्यांना
वैमानिक होण्याची आवड असल्यामुळे त्यांनंतर
शिक्षण न घेता वैमानिकाचे प्रशिक्षण घेऊन
टाटा समुहात काम सुरु केले. १९२९ मध्ये
टाटा एअर लाईन्स ही कंपनी सुरु केली.
१९३२ पासून त्या कंपनीने प्रवासी सेवा सुरु
केली हीच कंपनी १९४६ मध्ये एअर इंडिया
या नावाने ओळखली जाऊ लागली. १९३८
पासून जे. आर. डी. टाटा उद्योग समुहाचे अध्यक्ष
म्हणून काम करु लागले. तेंव्हापासून त्यांनी उद्योगाच्या
कर्मचाऱ्यांसाठी दिवसाचे आठ तास काम, मोफत
आरोग्य सेवा, भविष्य निर्वाह निधी अपघात
विमा योजना सुरु केल्या. विशेष म्हणजे पुढे या
सर्व योजना केंद्र सरकारने सर्व उद्योगांना
बंधनकारक केल्या. त्यांच्या काळातच टाटा
समुहाचा विस्तार होऊन एकूण ९५ कंपन्या झाल्या
भारतातील पहिले कर्करोगासाठी रुग्णालय व
संशोधन केंद्र मुंबईत सुरु केले. जे. आर. डी.
यांना अनेक पुरस्कार मिळाले, त्याव्यतिरिक्त
भारत सरकारचा पद्मविभूषण १९५५ मध्ये
आणि भारतरत्न १९९२ मध्ये प्रदान करण्यात
आला. भारतातील हवाई टपाल सेवा ही १९३२
मध्ये त्यांनी सुरु केली, आणि विशेष म्हणजे ते
टपाल जे. आर. डी. घेऊन स्वतः त्या विमानाचे

PREP. BY: CHECKED BY: DATE: SHEET: OF

सारथ्य करीत मुंबई ते कराची येथे ~~गेले~~
गेले आणि टपालाचे खोके कराचीच्या
पोस्ट मास्तरांच्या हातात दिले होते, त्यावेळी
त्यांचे वय २८ वर्षे होते. पुढे १९८२ मध्ये
भारतातील हवाई टपाल सेवेचा सुवर्णमहोत्सव साजरा
करण्यासाठी वयाच्या ७८व्या वर्षी, त्याच विमानाचे सारथ्य
करीत मुंबईहून, जे आरडी टपाल घेऊन कराचीला गेले
होते. टाटा उद्योग समुह दानशूर म्हणून प्रसिद्ध आहे
भारतातील अनेक संस्थांना देणग्या आणि आर्थिक
सहाय्य केले आहे. २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या
दहशतवादी हल्ल्यानंतर टाटा समुहाने जे आरडींच्या
नेतृत्वाखाली अनेक पिडीतांना स्वतःच्या पायावर उभे
राहण्यासाठी मदत केली होती

२९ नोव्हेंबर, १९९३ ह्या दिवशी काही कामाने
जे. आर. डी. टाटा जिनिव्हा येथे गेले असताना
तेथेच त्यांचे निधन झाले. भारताच्या ह्या थोर सुपुत्रास
अभिवादन करुन मी हा लेख संपवतो.

डॉ. अरुण जोशी
संपर्क - ९८६९२६७५२०



